# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १९ वा रविवार दि.१६ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


# अजितदादांच्या शिखर बँक क्लोजर रिपोर्टशी माझा संबंध नाही; अण्णा हजारेंचा खुलासा

मुंबई : लोकसभा निवडणुकीपूर्वी शिखर बँक घोटाळ्याप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा दिलासा मिळाला होता. अजित पवार आणि त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांना मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं क्लीनचीट दिली होती. मात्र आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या अतिरिक्त क्लोजर रिपोर्टवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आक्षेप घेतल्याच्या बातम्या दोन दिवसांपूर्वी समोर आल्या होत्या. त्यामुळे अजित पवार यांची शिखर बँक घोटाळाप्रकरणी पुन्हा अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मात्र याप्रकरणी आता क्लोजर रिपोर्टशी माझा काही संबंध नसल्याची प्रतिक्रिया अण्णा हजारो यांनी दिली आहे.

शिखर बँक घोटाळ्या प्रकरणी पोलिसांनी दाखल केलेल्या अतिरिक्त क्लोजर रिपोर्टवर अण्णा हजारे यांनी आक्षेप घेत निषेध याचिका दाखल करण्यासंदर्भातील बातम्या समोर आल्या होत्या. यावर प्रतिक्रिया देताना अण्णा हजारे म्हणाले की, शिखर बँक घोटाळा प्रकरणात माझा कुठलाही संबंध नसून माझ्या नावाचा दुरुपयोग करून काही लोक स्वार्थ साधत आहेत, असा आरोप अण्णा हजारे यांनी केला आहे.

शिखर बँक घोटाळा प्रकरणात क्लीन चिट देण्यात आल्याच्या मुद्द्यावर मी काहीच प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. मी न्यायालयात जाईल असंही कधी म्हटलेलं नाही. तरीही माझ्या नावाने प्रतिक्रिया व्हायरल होत आहेत. माझं नाव आल्याचं ऐकून मला धक्का बसला आहे. कारण १५ वर्षांपूर्वी मी या प्रकरणात आवाज उठवला होता. मात्र, आता यात माझा कुठलाही संबंध नाही. त्यामुळे अजित पवार यांना दिलेल्या क्लीन चीट संदर्भात ज्यांना माहिती आहे तेच बोलतील. माझा कुठलाही संबंध नाही, असं स्पष्टीकरण अण्णा हजारे यांनी दिलं.



विरोधकांची अण्णा हजारेंवर टीका

दरम्यान, २५ हजार कोटी रुपयांच्या शिखर बँक घोटाळ्यात अजित पवार आणि इतरांची नावे समोर आली होती. या प्रकरणी मुंबईच्या गुन्हे अन्वेषण शाखेने उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांना क्लीन चिट दिली आहे. अजित पवार याांच्याविरोधात कोणतेच पुरावे नाहीत, असं पोलिसांनी सांगितले होते. मात्र याप्रकरणी अतिरिक्त क्लोजर रिपोर्टवर अण्णा हजारे यांनी आक्षेप घेत निषेध याचिका दाखल केल्याची बातमी समोर आल्यानंतर विरोधी पक्षातील नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या होत्या. अजित पवारांना लक्ष्य केलं जात असल्याचं काहींनी म्हटले होते, तर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अण्णा हजारे यांनाच लक्ष्य केले होते.

# नीट परीक्षेचे पावित्र्य धोक्यात येणे चिंताजनक

## एकाही गुणवंत विद्यार्थ्यावर अन्याय होणार नाही याची शासनाने हमी द्यावी आ. अमित विलासराव देशमुख

लातूर /प्रतिनिधी :- नीट परीक्षेच्या निकालातील गोंधळामुळे संपूर्ण देशातील शैक्षणिक क्षेत्र हादरून गेले असून या परीक्षेतील पवित्र धोक्यात आल्याने विद्यार्थी वर्ग भविष्याच्या चिंतेने ग्रासला गेला आहे. शासनाने या परीक्षेतील गैरप्रकार तातडीने शोधून काढून अभ्यासू आणि कष्टाळू विद्यार्थ्यांना अश्वस्त करणे आवश्यक बनले असल्याचे माजी वैद्यकीय शिक्षण तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आ अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. माजी वैद्यकीय शिक्षण तथा संस्कृती कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या संदर्भाने प्रसिद्ध दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नियोजित वेळेपूर्वी घाही गडबडीत ऐन लोकसभा निवडणुकीच्या निकाला दिवशीच नीट परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या निकालात तब्बल ६७ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी म्हणजे ७२० मार्क मिळाल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. त्यात १५६३ विद्यार्थ्यांना ग्रेस गुण दिल्याची माहिती पुढे आली आणि त्यानंतर एका पाठोपाठ या परीक्षेतील अनेक गैरप्रकार उघड होत आहेत. एकंदरीत या परीक्षेचे पावित्र्यही आता धोक्यात आल्याची भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. परिणामी देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे आणि संतापाचे वातावरण तयार झाले आहे. डॉक्टर बनून रुग्ण सेवा करण्याच्या उद्देशाने दरवर्षी प्रचंड मेहनत आणि कष्ट करून विद्यार्थी ही नीटची परीक्षा देतात . यावर्षी देशातील २३ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. या परीक्षेच्या निकालात गोंधळ झाल्याचे उघड झाल्यानंतर गुजरात, हरियाणा, बिहार यासह इतर अनेक राज्यात पेपर फुटीचे प्रकारही आता पुढे आले आहेत. त्यामुळे परीक्षा दिलेल्या आणि भविष्यात ही परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.महाराष्ट्र राज्यात तर या परीक्षेला अनन्यसाधारण महत्त्व आहे, येथील वैद्यकीय सेवेचा लौकिक जगभरात पसरलेला आहे त्यामुळे, राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये डॉक्टर होण्याकडे मोठा कल आहे, राज्यात आणि देशात शिक्षणाचा आदर्श पॅटर्न निर्माण करणाऱ्या लातूर मध्ये दरवर्षी हजारो विद्यार्थी खूप मोठी तयारी करून नीट ची परीक्षा देतात, त्यामुळे दरवर्षी राज्यात वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवणारे सर्वाधिक विद्यार्थी लातूरचे असतात, अलीकडच्या काळात मराठवाड्यातील नांदेड छत्रपती संभाजीनगर, धाराशिवसह राज्यात सर्वत्र या पॅटर्नचा अनुकरण होत आहे. अथक परिश्रम करून गुणत्तेच्या जोरावर या परीक्षेत यश मिळवण्याची खात्री बाळगून



असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नीट परीक्षेतील गोंधळामुळे चिंतेचे वातावरण आहे,सध्या नीट परीक्षेतील गोंधळाचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे हे जरी खरे असले तरी महाराष्ट्र शासनानेही राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यावर अन्याय होणार नाही याची हमी देणे आवश्यक आहे, यूपीएससी, एमपीएससी पासून, विविध खात्यांच्या भरती प्रक्रियेत पेपर फुटी आणि गैरप्रकार झाल्याच्या घटना ताज्या आहेत, त्यात आता नीट परीक्षेचे पावित्र्यही संपुष्टात आल्याचे दिसून येत आहे त्यामुळे एकंदरीत सर्व प्रकारच्या परीक्षा आणि नोकर भरतीची प्रक्रिया पारदर्शक बनवणे अनिवार्य बनले आहे. त्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू करून त्यासंबंधीची माहिती प्रसारित करणे गरजेचे असल्याचेही आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# महायुतीत आम्हीच मोठा भाऊ

मुंबई : प्रतिनिधी लोकसभा निवडणुका संपताच राज्यातील राजकीय पक्ष विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. जागावाटपावरून हेवेदावे सुरू झाले आहेत. याचदरम्यान शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एक विधान केले आहे. या विधानामुळे विधानसभेच्या निवडणुकांचे बिगूल वाजण्याआधीच वादाचे ढोल वाजू लागले आहेत.आमचा स्ट्राईक रेट चांगला आहे, त्यामुळे आम्ही मोठा भाऊ, असे विधान शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी केले आहे. शिरसाट यांनी केलेल्या विधानामुळे महायुतीत जागावाटपावरून वाद पेटण्याची शक्यता वर्तवली जातेय. विधानसभेत शिवसेना आणि अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीकडून जास्त जागांची मागणी केली जाणार आहे, यामुळे वाद होण्याची शक्यता आहे.



लोकसभेत शिवसेनेने १५ जागा लढवल्या होत्या, त्यापैकी ७ जागांवर त्यांनी विजय मिळवला. त्यानुसार विधानसभेत शिवसेना अधिक जागांचा दावा करेल. शिवसेनेच्या या दाव्यामुळे विधानसभेचे बिगूल वाजण्याआधी महायुतीत वादाचे ढोल वाजू लागलेत.ठाकरे यांनी लढविलेल्या जागा २२, आम्ही लढविलेल्या १५ आहेत. यात तुलना केली तर आमचा स्ट्राईक रेट चांगला असून तो ४६ टक्क्यांवर आहे. त्यामुळे आम्हाला जास्त जागा मिळाल्याचे संजय शिरसाट म्हणाले.

## धनंजय मुंडेंनी उचलली पंकजा मुंडेंच्या पराभवाची जबाबदारी

बीड : प्रतिनिधी लोकसभा निवडणुकीमध्ये बीडची निवडणूक देखील प्रतिष्ठेची ठरली होती. महायुतीकडून पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली होती. पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी एवढ्या दिवस विरोधक म्हणून काम करणारे त्यांचे बंधू धनंजय मुंडे यांनी जोरदार प्रचार केला. धनंजय मुंडे यांच्या अथक प्रयत्नांनंतर देखील बीडमध्ये पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे हे ६ हजार ५५३ मतांनी विजयी झाले. या पराभवानंतर धनंजय मुंडे यांनी पहिल्यांदाच माध्यमांसमोर येत पंकजा मुंडेंच्या पराभवाची जबाबदारी स्वत: स्वीकारली.दरम्यान, धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेत बीडमधील पराभवाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. ते म्हणाले, ‘पंकजा मुंडेंच्या प्रचाराची जबाबदारी माझ्यावर होती. त्यामुळे या पराभवाची पूर्ण जबाबदारी मी घेतली आहे. या पराभवाचे मला दु:ख आणि खंत आहे. बीडच्या जनतेचे मी आभार मानतो की देशात सर्वाधिक मतदान झालेल्या पहिल्या बारा उमेदवारांमध्ये आमच्या महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना स्थान मिळाले. त्यांचा अतिशय कमी मतांनी पराभव झाला याचे दु:ख मला आहे, असे मत त्यांनी मांडले.पुढे धनंजय मुंडे म्हणाले, लोकसभेत महायुतीच्या उमेदवाराचे नुकसान झाले आहे. विधानसभेत चित्र काय असेल ते मी आजच सांगत नाही.

# आमचं सरकार वारकऱ्यांचे सरकार ! - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : - आषाढी वारीच्या पूर्व नियोजनाबाबत शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत ( तउ द्वारे ) उपस्थित होते. वारकरी संप्रदायांतील सर्व पालखी, विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती अध्यक्ष व सदस्य, संत समाधी संस्थान प्रमुख, संत वंशज, वारकरी फडकरी दिंडी संघटना व प्रमुख वारकरी प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. बैठकीस उपस्थित असणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला मुख्यमंत्री सन्मानाने आदराने भेटले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आषाढी वारीसाठी गतवर्षी पंढरपुरात भेट देऊन, पाहणी करून तयारी केली होती. यंदाही चांगले नियोजन करून, आषाढ वारी स्वच्छ, निर्मल आणि सुरक्षित व्हावी यासाठी शासनाच्या सर्वच विभागांनी चांगली तयारी केली आहे. विशेषतः अपघात टाळण्यासाठी गृह विभागाला नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. हे सरकार सर्व सामान्यांचे आहे. शेतकऱ्यांचे, वारकऱ्यांचे आहे. सरकराने कमी वेळात शेतकरी,



माता भगिनी आणि तरुणांसाठी जास्तीत जास्त निर्णय घेतले आहेत.यां सकल वारकऱ्यांच्या भेटीने जणू पंढरपूर चा पांडुरंग व सकल संत यांचे आशीर्वाद मिळाले ही भावना त्यांनी व्यक्त केली. सर्व सामान्य वारकरी केंद्रस्थानी ठेऊन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे वारी बाबतचे निर्णय घेतले आहे. वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा हे साहेबांनी कृतीतून दाखवून दिले आहे. वारकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी मुख्यमंत्री कटीबद्ध आहेत.

बैठकीतील महत्वपूर्ण निर्णय -

१) पालखी सोहळ्यातील दिंड्यांना प्रत्येकी २०, ००० रु अनुदान ( १५०० पेक्षा अधिक दिंड्यांना होणार लाभ )

२) वारकऱ्यांच्या वाहनांना टोल माफी देण्यात आली आहे.

३) वारी दरम्यान वारकऱ्यांना रु.५ लक्ष विमा कवच लागू.

४) वारीच्या वाटेवरील अनाधिकृत बांधकाम हटवणार.

५) आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी उपक्रमाद्वारे आरोग्याकडे विशेष लक्ष.

६) वारीच्या वाटेवरील सर्व महामार्गांची दुरुस्ती व स्वच्छता नियोजन याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

७) वारकऱ्यांना दर्शन सुलभ होण्यासाठी सूचना करण्यात आल्या आहेत.

८) पावसाळा असल्याने ठाई ठाई निवारा शेड बांधण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे.

९) पुण्यसलीला इंद्रायणी व चंद्रभागा नदी पात्र व परिसर स्वच्छता याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

१०) वारीसाठी विशेष अधिकारी नेमणूक , वर्षभर वारकऱ्यांच्या समस्या याद्वारे सोडवल्या जाणाऱ्या याबाबत सूचना.

११) निर्मल वारी अंतर्गत मोबाईल टॉयलेट्स मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणार.

व इतर तत्सम सर्व महत्वपूर्ण मागण्या सरकार सकारात्मक रित्या पूर्ण करील हा विश्वास प्राप्त झाला.

महत्वपुर्ण नोंद - दौंड येथील प्रस्तावित कत्तलखान्याचा विषय मांडताक्षणी मुख्यमंत्री महोदयांनी तात्काळ त्याला स्थगिती देऊन रद्द करण्याचा निर्णय घेतला. वारकरी संप्रदायाविषयी व वारी विषयी त्यांची असणारी श्रद्धा व आत्मीयता त्यांच्या प्रत्येक शब्दातून व देहबोलीतून दिसून येत होती. बैठकीस पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, विशेष पोलीस महानिरीक्षक पश्चिम महाराष्ट्र , पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार, पुणे, सोलापूर आणि सातारा जिल्ह्यांचे जिल्हा अधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

# महाविकास आघाडीचे लवकरच जागावाटप

मुंबई : लोकसभा निवडणुकीनंतर आता राज्यात विधानसभा निवडणुकांची चर्चा जोरदार सुरू आहेत. महाविकास आघाडी विधानसभा निवडणुका लढणार आहे. दरम्यान, आता महाविकास आघाडीत छोटा भाऊ आणि मोठा भाऊ कोण यावरुन चर्चा सुरू आहेत. महाविकास आघाडीतील नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आज मुंबईत महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी सर्व राजकीय चर्चांना पूर्णविराम दिला.



मुंबईत महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत शरद पवार, उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, संजय राऊत आदी नेते उपस्थित होते. यावेळी पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, या निवडणुकीत मोठा भाऊ छोटा भाऊ असे काही चालणार नाही. प्रत्येक मतदारसंघात आम्ही बसून सर्वात चांगला उमेदवार कोणत्या पक्षात आहे बघून त्यांना उमेदवारी देणार आहे. मागच्या निवडणुकीचे संदर्भ घेऊन निर्णय घेऊ, आज आमची प्राथमिक बैठक झाली आहे, असे सांगत काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम दिला. महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक जवळपास प्रत्येक मतदारसंघांमध्ये उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी प्रचार केला असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

## संपादकीय....

### कुवेतचा धडा

पोटाची खळगी भरण्यासाठी आखाती देशांची वाट धरणार्या भारतीयांची कुवेतमध्ये अग्निकांडात झालेली होरपळ जीव हेलावून टाकणारी तर आहेच, शिवाय या प्रगत आणि सुखासीन देशांच्या वास्तवावर प्रकाश टाकणारीही आहे. त्याहून भारतातील रोजगाराच्या न मिळणार्या संधीमुळे युवकांची होणारी परवड आणि रोजगारासाठी विदेशांत, विशेषत: आखातात होणारे लाखोंचे स्थलांतर हासुद्धा तितकाच चिंतेचा विषय ठरला आहे. या ताज्या दुर्घटनेने गंभीर वास्तवाकडे लक्ष वेधले आहे. आखाती राष्ट्रांत नोकरीधंद्यासाठी गेलेल्या तरुणांची केली जाणारी फसवणूक हा नवा विषय राहिलेला नाही. दरवर्षी अशा अनेक घटना समोर येतात. अनेक तरुण फसवणुकीस बळी पडतात. दुसर्या घटनेत, कुवेतमध्ये बांधकाम मजूर राहत असलेल्या इमारतीला लागलेल्या आगीत किमान ४९ जणांचा मृत्यू झाला असून, त्यात ४५ भारतीय नागरिक होते. दक्षिण कुवेतमधील अल–अहमदी येथील अल नगा इमारतीला बुधवारी पहाटे आग लागली.

'एबीटीसी' या बांधकाम कंपनी समूहाने ही इमारत मजुरांच्या निवार्यासाठी भाड्याने घेतली असून, त्यात सुमारे २०० मजूर राहत होते. बहुतांश मजूर केरळ, तामिळनाडू वगैरे राज्यांतील होते. कुवेतचे गृहमंत्री शेख फहाद अल युसुफ अल सबा यांनी घटनेच्या चौकशीचे आदेश दिले असून, इमारतींच्या मालकांना ताब्यात घेतले आहे. ही दुर्घटना इमारतीचे मालक आणि कंपनीच्या दुर्लक्षामुळे घडल्याचे त्यांनी म्हटले आहे. याचा अर्थ, कुवेतमध्येही इमारतींमधील सुरक्षाविषयक नियमांचे पालन होत नसावे. अग्निकांडातील दोषींना माफ केले जाणार नाही, असे कुवेतच्या अमिरांनी म्हटले आहे; परंतु प्रत्यक्षात कोणती पावले उचलली जातात, हे पाहावे लागेल. दिवंगत परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी परदेशांत आपत्तीत सापडलेल्या अनेकांना पूर्वी सुखरूपपणे भारतात आणण्याची व्यवस्था केली होती.

पाकिस्तानात १५ वर्षे खितपत पडलेल्या गीता नावाच्या मूकबधिर तरुणीला त्यांनी भारतात आणले. तसेच एका शोषणग्रस्त बालकासही नॉर्वेमधून भारतात आणले होते. त्याही आधी १९९० मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण केले होते, त्यावेळी चार लाख नागरिकांनी शेजारील देशांचा आसरा घेतला होता. त्या संकटकाळात भारत सरकारने सलगपणे ४८८ खास विमाने पाठवून, दोन महिन्यांत कुवेतस्थित १ लाख ७० हजार भारतीयांची सुटका करून त्यांना यशस्वीपणे भारतात आणले होते. याच विषयावर अक्षयकुमारचा 'एअरलिफ्ट' नावाचा चित्रपटही आला होता. आताही भारत सरकारने परराष्ट्र राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंग यांना कुवेतला धाडून, भीषण आगीत मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांचे पार्थिव हवाई दलाचे भारतात आणले.

कीर्तिवर्धन सिंग यांनी कुवेतमधील रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींची विचारपूस केली असून, केंद्र सरकारने मृत भारतीयांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. केरळ सरकारनेही पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. थोडक्यात, सरकार पातळीवरून सर्व मदत केली जात आहे. कुवेतची लोकसंख्या ५० लाखांच्या आत असून, तेथे ११ लाख भारतीय मजूर आहेत. भारतात सहजासहजी रोजगार मिळत नाही. अशावेळी नाइलाजाने लोक कुटुंबीयांपासून दूर जाऊन काम करतात. मध्यंतरी इस्रायलमध्येही काही मजूर गेले होते आणि तेथील युद्धाच्या परिस्थितीमुळे अडचणीत आले होते. कुवेतमधील ज्या इमारतीत ही घटना घडली, तेथे क्षमतेपेक्षा जास्त कामगार रेटारेटी करून राहत होते. कुवेतमध्ये अस्वच्छ आणि कोणत्याही सोयी नसलेल्या ठिकाणी हे मजूर राहतात.

गेल्या चार वर्षांतच आखातातील विविध देशांतील भारतीय दूतावासांकडे ४८ हजार भारतीय मजुरांनी वेगवेगळी गार्हाणी मांडली आहेत. अनेक ठिकाणी त्यांना खायला धड अन्न मिळत नाही. वेळेवर पगार दिला जात नाही. अपमान सहन करावा लागतो व मारझोडही केली जाते. बर्याचदा दलालांकडे भरपूर फी देऊन मजुरांनी नोकरी मिळवलेली असते आणि तेथे पोहोचल्यावर त्यांचा पासपोर्ट काढून घेऊन, त्यांना कमी पगारावर राबवले जाते. म्हणूनच आखाती देशांत नोकर्यांसाठी जाणार्या भारतीयांच्या संरक्षणाच्या व हिताच्या दृष्टिकोनातून भारत सरकारला स्वतंत्रपणे विचार करावा लागेल.

कुवेतमधील त्या इमारतीत तळमजल्यावर दोन डझन गॅस सिलिंडर होती. तसेच कागद, कार्डबोर्ड, प्लास्टिकचा पार्टिशनसाठी वापर केला होता. छताकडे जाणार्या मार्गावरील वाट बंद केली होती. याचा अर्थ, प्राथमिक नियमांचेही पालन केले गेले नव्हते. सुरक्षेचे किमान संकेतही पाळले जात नव्हते. अग्निरोधक सामग्री बसवली नव्हती. आता कुवेतमधील सर्वच शहरांमधील महापालिकांना अग्निसुरक्षाविषयक नियमांचे पालन होत आहे की नाही, हे पाहण्याचे आदेश उपपंतप्रधानांनी दिले आहेत. पश्चिम आशियाई देशांत भारत सरकारचा दबदबा आहे आणि आपले–त्यांचे संबंधही चांगले आहेत. अशावेळी संबंधांचा वापर करून, स्थलांतरित भारतीय मजुरांची विशेष काळजी घेण्याची आग्रही सूचना आपण करायला हवी. सुमारे ८८ लाख भारतीय हे आखाती देशांत काम करतात. सुतार, गवंडी, इलेक्ट्रिशियन, फूड डिलिव्हरी बॉय, बांधकाम व कारखान्यांत काम करणारे मजूर असे तेथे काम करणारे सर्व भारतीयच आहेत. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात परकीय चलनही आपल्याला मिळते.

उच्चशिक्षितांना जरी आखाती देशांत भरपूर वेतन मिळत असले, तरी अकुशल किंवा अर्धकुशल भारतीय मजुरांची संख्या प्रचंड असून, त्यांना त्या प्रमाणात वेतन मिळत नाही. तेथे विशेषतः बांधकाम व घरकामाच्या क्षेत्रात 'काफला' ही पद्धती आहे. मजुरांचे सर्व जीवन मालकाशी बांधणारी ही एकप्रकारची वेठबिगारीच आहे. पश्चिम आशियाई देशांशी भारताने परस्पर सामंजस्याचे करार केले आहेत. त्या अंतर्गत असणार्या नियम आणि पद्धतींची पुनर्रचना, आवश्यक ते बदल करून, भारतीय मजुरांना तेथे व्यक्तिगत सुरक्षा आणि सामाजिक सुरक्षितता लाभेल, कामाची, त्याचबरोबर निवासाची ठिकाणे सुरक्षित असतील, किमान सोयी–सुविधा तेथे उपलब्ध असतील, याची काळजी भारत सरकारने घेतली पाहिजे; अन्यथा अशाच दुर्घटना होत राहतील आणि निरपराध लोक त्यात बळी पडत राहतील.

# मराठी लघुपटांच्या वाढत्या दर्जाला राज्य शासनाचीही दाद हवी!




मुंबईच्या पेडर रोडवर असूनही निसर्गरम्य राहिलेला एनएफडीसी, फिल्म डिव्हिजन यांच्या कार्यालयांचा मोठा परिसर त्यात चार अत्याधुनिक चित्रपटगृहे, इथे १५ जूनपासून १८ वा 'मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' सुरू झाला आहे आणि त्यात सुमारे ४२ निवडक लघुपटांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. पण त्याआधी या महोत्सवात निवड होण्यासाठी देश, विदेशातून आलेले अनेक चित्रपट पाहून मगच त्यांची निवड करण्याच्या कामात तीन वेगवेगळ्या निवड समित्या गुंतल्या होत्या. विविध राज्यांतून निवडलेले प्रत्येकी चार सदस्य एकेका समितीवर होते. यापैकी भारतीय कथात्मक, लघु व निमेशन चित्रपटांच्या (३० मिनिटांहून कमी लांबीचे) निवड समितीचा मी एक सदस्य, म्हणून ४६५ कथात्मक लघुपट पहाण्याची संधी मला या चित्रपट महोत्सवामुळे मिळाली. यापैकी निवडक लघुपटांचा हा महोत्सव १५ जूनपासून सुरू होतो आहे.

हिंदी व इंग्रजीतले २००, मराठी ५८, तामिळ २९, बंगाली २५, मल्याळम १७, तेलुगु ७, त्याखेरीज संस्कृत, कन्नड, राजस्थानी, उर्दू, गुजराती, उडिया, कोकणी, काश्मिरी, पंजाबी, नेपाळी, सिक्कीमी, मारवाडी, भोजपूरी आणि काही आदिवासी भाषांतले लघुपट तर ३३ अँनिमेशन चित्रपट या कामामुळे पाहाता आले. स्त्री दिग्दर्शिकांचे संवेदनशील विषयावरील; तर नव्या दिग्दर्शकांचे पहिलेवहिले लघुपट इथे होते. काही लहान गावातल्या नवख्या दिग्दर्शकांनी निर्माण केलेले, तर काही मुंबई, दिल्ली, बंगळुर, चेन्नई सारख्या मोठ्या शहरातले प्रथितयश दिग्दर्शकांचे. देशभरच्या एन.आय.डी., आय.डी.सी. (आय.आय.टी.) एफ.टी.आय.आय., सत्यजीत रे फिल्म इन्टिट्यूट तसेच डॉ.भूपेन हजारिका फिल्म इन्टिट्यूट यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांच्या विद्यार्थ्यांकडून तयार झालेले लघुपटही निवडीसाठी आले होते.

या लघुपटाचे अवलोकन करत असताना आनंदाच्या दोन बातम्या कळल्या : या महोत्सवासाठी सादर केलेला, चिदानंद नाईक या 'एफटीआयआय पुणे'च्या विद्यार्थ्याचा 'सनफ्लॉवर्स वेअर द फर्स्ट वन्स टु नो' हा लघुपट कान महोत्सवात, 'ल सिनेफ' पुरस्कार–विजेता ठरल्याची पहिली बातमी, तर दुसरी आनंदाची बातमी याच पुणेस्थित संस्थेच्या माजी विद्यार्थिनी पायल कापडिया यांनी दिग्दर्शित केलेल्या 'ऑल वी इमॅजिन अज लाइट' या चित्रपटाने कान महोत्सवात दुसऱ्या क्रमांकाचा, पण जागतिक स्तरावर प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'ग्रांप्री' हा पुरस्कार मिळवल्याची!

वेगवेगळ्या भाषा, सादरीकरणाच्या शैली, तंत्र यांचे वैविध्य यांसोबतच या लघुपटांतून जाणवले ते विषयांचे वैविध्य नातेसंबंध, मानवी संवेदना, समलैंगिकता, जातिव्यवस्था, पर्यावरण, स्थानिक पारंपारिक वाद्यांचा परिचय अशा अनेक विषयांवरील हे लघुपट. त्यात डॉ.मोहन आगाशे ते नासीरुद्दीन शहा, भार्गवी चिरमुले ते सतीश पुळेकर यांच्यासारख्या कलाकारांचा सशक्त अभिनय.

अशा ४६५ लघुपटांमधून फक्त ४० ते ४२ लघुपट महोत्सवासाठी निवडायचे म्हणजे मोठे जिकीरीचे काम. म्हणजेच आठवडाभर चालणाऱ्या महोत्सवामध्ये फक्त १२ तास (३० मिनिटापेक्षा कमी वेळेच्या या कथात्मक लघुपटासाठी) अनेक चित्रपट असलेल्या भाषेतील किमान ३ तर इतर भाषेतून आलेल्यांमधून निदान १ तरी लघुपट निवडावा असे सर्वसाधारण धोरण. अनेक चित्रपट हे सर्वच दृष्टीने उत्तमच असतात. पण वेगवेगळ्या भाषा, भाषेमधील व राज्या–राज्यामधील चित्रपटांची निकोप स्पर्धा इथे असते. मराठी चित्रपटांचा दर्जा उत्तम असल्यामुळे ५८ लघुपटांमधून ६ लघुपट आम्ही निवडू शकलो.

त्यामुळेच प्रकर्षाने जाणवले की, महाराष्ट्रातील लहानमोठ्या शहरांमधील हौशी, होतकरु तरुण मुलेही तंत्राचा योग्य वापर करत आहेत. काही तरुण चित्रपट संस्थेमधून रितसर शिक्षण घेतात. अनेकजण वेगवेगळ्या चित्रपट महोत्सवात हजेरी लावून, देश–विदेशातून आलेल्या कलाकृती बघून, वेगवेगळ्या दिग्दर्शकांच्या कल्पकतेचा अभ्यास करतात. या संस्कारामधून त्यांच्यातील चांगला कलाकार, तंत्रज्ञ, दिग्दर्शक घडत जातो. या प्रक्रियेतून त्यांच्याकडून आपल्याला अभिमान वाटावा अशा उत्तमोत्तम कलाकृती निर्माण होतात. यातल्या काही कलाकृतीचा जगन्मान्य चित्रपट महोत्सवांत गौरव होत रहातो. परंतु पुढे या चित्रपटांचे काय होते ? ते कुठे दाखविले जातात ? हे चित्रपट लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी कुठे व किती असे महोत्सव आयोजित केले जातात ? चित्रपटाच्या निर्मितीसाठी केलेला खर्च तरी निघतो का? सरकार त्यांच्या मालकीचे चित्रपटगृह, असे चित्रपट दाखविण्यासाठी मोफत उपलब्ध करून देऊ शकत नाही का? या सूचना प्रेक्षक व समीक्षकांकडून नेहमीच केल्या जातात पण त्या दिशेने विशेष कृती केली जात नाही. आता किमान एवढे तरी महाराष्ट्र शासनाने ऐकावे. राज्य शासनातर्फे दर १ किंवा दोन वर्षांनी केवळ मराठीतील पूर्ण लांबीच्या व लघु चित्रपटांचा एक महोत्सव भरवावा, सर्वोत्कृष्ट लघु चित्रपट व दिग्दर्शक आणि निर्मात्याला दोन–तीन लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे व इतर काही तांत्रिक कौशल्यांसाठी स्वतंत्र पारितोषिके देऊन प्रोत्साहित करावे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, हे बक्षीसपात्र मराठी लघुपट, जगातील काही प्रसिद्ध चित्रपट महोत्सवासाठी शासनाने प्रवेश शुल्क भरून पाठवावेत.

भारत सरकारतर्फे (सुचना व प्रसारण मंत्रालय) दर दोन वर्षांनी मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे (वृत्त चित्र, लघुचित्र व ॲनिमेशन चित्रपट) आयोजन केले जाते. प्रत्येक विभागातील सर्वोत्कृष्ठ चित्रपट, निर्माता, दिग्दर्शक, छाया चित्रकार, संकलक, ध्वनी संयोजक अशी एकंदर ४४ लाख रुपयांची १३ बक्षिसे देऊन या सर्वांच्या कामाचे कौतुक केले जाते. हे राज्यपातळीवर, मराठीसाठी होण्यास काय हरकत आहे? १५ ते २१ जून पर्यंत हा 'मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आपण पाहूच, पण राज्य शासन मराठी लघुपटांचा वाढता दर्जा लक्षात घेऊन काही प्रोत्साहन कधी देणार, याची वाटही पाहू!

# शेतकरी हितात मोदींचे आणि देशाचे हित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पहिल्या सत्ता काळात भूसंपादन कायदा मागे घ्यावा लागला. दुसऱ्या सत्ता काळात तीन कृषी कायदे मागे घ्यावे लागले. प्रामुख्याने दुसऱ्या कार्यकाळात मोदी सरकारच्या मानगुटीवर शेतकरी आंदोलनाचे भूत कायम राहिले. आता तिसऱ्या सत्ता काळात मोदींना शेती आणि शेतकऱ्यांबाबतचा कोणताही कायदा मागे घ्यावा लागू नये. उलट मोदी सरकारने शेती, शेतकरी हिताचे निर्णय घेऊन देशहिताला बळ द्यावे, अशीच सर्वसामान्य शेतकऱ्यांची अपेक्षा असणार आहे.

शेतकरी प्रश्नांची सुरुवात उत्तरेतून करूया. पंजाब, हरियाणा ही दोन राज्ये देशाची भूक भागविण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. गहू आणि तांदूळ उत्पादनात आघाडीवर असलेली ही राज्ये लोकसंख्येने लहान आहेत. हरियाणातून दहा आणि पंजाबमधून तेरा म्हणजे लोकसभेच्या जेमतेम २३ जागा या दोन राज्यांतून येतात. पण, दिल्लीला लागून असलेली सीमा, राजस्थान आणि उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्यांवर प्रभाव पाडण्याची ताकद आणि राजधानी दिल्लीची भाजीपाला, वाहतुकीसह चहुफेर नाकेबंदी करण्याची क्षमता असलेल्या या दोन राज्यांतील जनमताकडे मोदींना दुर्लक्ष करून चालणार नाही. ही दोन राज्ये गहू आणि तांदूळ उत्पादनात आघाडीवर आहेत. त्या शिवाय राजधानी दिल्लीला भाजीपाला, फळे आणि दूध, दुग्धजन्य पदार्थांसाठी या दोन राज्यांवर अवलंबून राहावे लागते. नेमक्या याच नाजुक स्थितीचा फायदा घेऊन पंजाब, हरियाणातील शेतकरी राजधानी दिल्लीची कोंडी करतात. किंबहुना केंद्रातील सत्ताधारी दिल्लीची कोंडी करण्याची संधी शेतकऱ्यांना देतात, असेच म्हणावे लागेल.

पंजाब, हरियाणातील शेतकऱ्यांच्या समस्या आणि कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांच्या एकसारख्या नाहीत आणि वेगवेगळ्याही नाहीत. म्हणजे पंजाब, हरियाणातील शेतकऱ्यांसाठी हमीभावाने होणारी सरकारी गहू, तांदूळ खरेदी जितकी महत्त्वाची आहे, तितकी ती महाराष्ट्र आणि कर्नाटकसह दक्षिणेकडील राज्यांसाठी नक्कीच नाही. पण, शेतीमालाला मिळणारा हमीभाव, दुधाला मिळणारा दर नक्कीच देशभरातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे.

मोकाट गुरांचा प्रश्न! उत्तरेतून काहीसे खाली मध्य भारतात आले की, लोकसंख्या, लोकसभेतील जागा आणि शेती उत्पादनात आघाडीवर असलेल्या उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश, या दोन मोठ्या राज्यांचा समावेश होतो. मोसमी पावसाच्या प्रमुख प्रभाव क्षेत्रातील ही दोन मोठी राज्ये आहेत. ही राज्ये प्रामुख्याने गहू, डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनात मोठी भूमिका बजावतात. ऊस, साखर उत्पादनात उत्तर प्रदेश आघाडीवर आहे. मध्य प्रदेशात भाजप सातत्याने चांगली कामगिरी करीत आहे. उत्तर प्रदेशात मात्र, या वेळी भाजपला मोठा फटका बसला आहे. प्रामुख्याने गोवंश हत्याबंदीसारखा निर्णय हिंदुत्ववादी विचारातून घेतल्याचे ठासून सांगण्यात आले. पण, हा निर्णय शेतकरीविरोधी ठरला. देशी गोवंशाच्या संख्येत वाढ झाली नाहीच, उलट मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशात मोकाट पशूंचा प्रश्न गंभीर बनला. केंद्राच्या या शेतकरी विरोधी धोरणांचा परिणाम थेट मतपेटीतून समोर आला. मध्य प्रदेशात गहू सरकारी खरेदीचा प्रश्न यंदा ऐरणीवर आला होता. राज्य सरकारकडून बोनसची मागणी केली जात होती. कडधान्ये, डाळी आणि मोहरीच्या दरात झालेली घट. मोहरीला हमीभावाइतकाही दर न मिळणे, या अडचणींचा मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना सामना करावा लागला. महाराष्ट्राला लाभ कधी? महाराष्ट्र सोयाबीन, कापूस, ऊस, डाळी, कांदा आदी पारंपरिक शेतीसह फळे, फुले, हरितगृह शेतीत देशाचे नेतृत्व करतो. देशातील प्रमुख साखर उत्पादक राज्य, कापूस, सोयाबीन उत्पादनातील आघाडीवरील राज्य. द्राक्ष, केळी, आंबा, मोसमी, संत्रा, डाळिंब, या फळांसह फुलांच्या उत्पादनात आणि निर्यातीतील आघाडीवरील राज्य. पण, दुर्दैवाने एकाही शेती उत्पादनाबाबत समाधान मानावे, अशी स्थिती मागील अनेक वर्षांपासून नाही. सोयाबीन, कापसाला मागील दोन वर्षांपूर्वी चांगला म्हणजे हमीभावापेक्षा वाढीव दर मिळत होता. मागील वर्षी जेमतेम हमीभाव मिळाला. द्राक्ष, केळी, डाळिंब, फुलांच्या निर्यातीवर निर्यात कर लागू केला. बांगलादेश सारख्या देशाने भाजीपाला, कांदा, फळे, फुले, साखर आयातीवर आयात कर लागू केला. त्यामुळे डाळिंब, द्राक्ष, केळी निर्यातीची हक्काची बाजारपेठ हातची गेली. केंद्र सरकारने कांदा निर्यातीचा पुरता खेळखंडोबा केला, त्याचा परिणाम कांदा पट्ट्यात थेट दिसून आला. कांदा निर्यात करण्याची परवानगी राष्ट्रीय सहकार निर्यात मर्यादित संस्थेला (एनसीईएल) दिला. एनसीएलने खुल्या बाजारातून कांदा निर्यात न करता थेट मोठ्या व्यापाऱ्यांकडून कांदा घेऊन निर्यात केला. त्यामुळे एनसीएलच्या कांदा निर्यातीचा सामान्य कांदा उत्पादकांना कोणताही फायदा झाला नाही.

मागील अनेक वर्षांपासून राज्यातील साखर उद्योग अडचणीत



होता. मागील वर्षी इथेनॉल निर्मिती, विक्री आणि साखर उत्पादन, निर्यातीतून साखर उद्योग अडचणीतून बाहेर येण्याची चिन्हे दिसू लागली होती. केंद्राने इथेनॉल उत्पादन आणि वापराला चालना देण्याची घोषणा केली. पण, प्रत्यक्षात मागील उसाचा गाळप हंगाम सुरू होताच प्रत्यक्षात साखर उत्पादनात मोठी घट होण्याच्या भीतीने इथेनॉल निर्मिती आणि साखर निर्यातीवर निर्बंध घातले. त्याचा परिणाम म्हणून यंदाचा साखर उत्पादन उद्योग अडचणीत आला. हजारो कोटींचे कर्ज कारखान्यांना घ्यावे लागले शिवाय इथेनॉल उत्पादनासाठी देशभरात झालेली शेकडो कोटींची आर्थिक गुंतवणूक अडचणीत आली आहे.

कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा या दक्षिणेतील राज्यांत तांदूळ खरेदी, मक्यासह अन्य शेतीमालाचे हमीभाव, कॉफीचे दर, मसाल्यांची निर्यात आदी प्रश्न उग्र झाले आहेत. मागील वर्षी तेलंगणात तांदळाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. कर्नाटकसारख्या राज्यात अमूल डेअरीला होत असलेला विरोध आणि कुक्कुटपालन, अंडी उत्पादकांसमोर असलेल्या अडचणी महत्त्वाच्या आहेत. पण, केंद्र सरकारने यापैकी बहुतेक समस्यांकडे दुर्लक्ष केले.

निर्यातबंदीची मालिका २०२४ ची लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून अन्नधान्यांची महागाई नियंत्रित ठेवण्यासाठी शेतकरी विरोधी निर्णयांची एक मोठी मालिकाच सुरू केली. प्रथम गहू, गव्हाचे पीठ, रवा, मैदा निर्यातीवर बंदी घातली आहे. त्यानंतर साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली. त्याचा पुढील टप्पा कांदा निर्यातीवर येऊन थांबला. देशात खाद्यतेलाच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी मागील वर्षी उच्चांकी खाद्यतेल आयात केली. जगात अतिरिक्त ठरलेल्या खाद्यतेलासाठी भारत डंपिंग ग्राऊंड ठरला. जगभरातील खाद्यतेल उत्पादक देशांनी, निर्यातदार कंपन्यांनी भारतात मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलाची निर्यात केली. त्याचा परिणाम म्हणून देशात सूर्यफूल, मोहरी, सोयाबीनच्या दरात मोठी घट झाली. देशात उत्पादित झालेल्या तेलबियांपासून तेल काढून विक्री करण्यापेक्षा आयात केलेल्या खाद्यतेलाची विक्री करणे सोयीचे ठरत होते. त्यामुळे देशात उत्पादित झालेल्या तेलबियांना हमीभावही मिळाला नाही. कडधान्ये, डाळींची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा दुप्पट म्हणजे सुमारे ४१ लाख टन डाळी, कडधान्यांची आयात झाली आहे. या आयातीमुळे देशांतर्गत बाजारात दर नियंत्रणात राहिले. पण, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कडधान्यांना हमीभावापासून वंचित राहावे लागले.

देशाचा एकूण जीडीपी आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ८.२ टक्क्यांवर राहिला आहे. पण, कृषी विकासाचा दर ३.७ टक्क्यांवर आहे. आजही देशाच्या अर्थव्यवस्थेत, कृषीपूरक उद्योग – व्यवसायात शेती क्षेत्र महत्त्वाचे आहे. मग देशाच्या एकूण जीडीपीच्या तुलनेत कृषी विभागाचा दर नगण्य का राहिला, हा प्रश्न उपस्थित होतो. सुदैवाने मध्य प्रदेशचा कृषी विकासाचा दर देशात सर्वाधिक ६.५ टक्के आहे. या राज्याचे नेतृत्व करणारे शिवराज सिंह चौहान देशाचे कृषिमंत्री झाले आहेत. शरद पवार यांच्या नंतर पहिल्यांदाच चौहान यांच्या रूपाने कृषी खात्याला कार्यक्षम मंत्री मिळाले आहेत. त्यामुळे आता कृषी क्षेत्रात व्यापक, पायाभूत बदलांची अपेक्षा आहे. तीन कृषी कायदे मागे घेतल्यानंतर केंद्र सरकारचे कृषी खात्याकडे झालेले दुर्लक्ष आता संपेल. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाला हातच न घालण्याच्या धोरणात बदल होईल. करार शेती, बाजार समित्यामुक्त शेती–मालाची खरेदी विक्री, ऑनलाइन खरेदी–विक्री, समूह शेती, सेंद्रिय शेतीबाबत व्यवहार्य निर्णय होण्याची प्रतीक्षा आहे.

देशाच्या १४० कोटी जनतेची भली मोठी भूक कोणत्याही परिस्थितीत आयातीवर भागवली जाऊ शकत नाही. किंबहुना अन्नधान्यांचे इतके उत्पादनही जगाच्या पाठीवर होत नाही. त्यामुळे पुरेसे अन्नधान्य उत्पादन होईल, याची तजवीज केलीच पाहिजे. उत्पादित झालेले अन्नधान्य, फळे साठवणुकीसाठी शीत साखळी उभारणे. प्रक्रिया उद्योगाचा विस्तार करणे. हवामान बदलातही टिकाव धरू शकतील, अशा संकरित वाणांसाठी संशोधन करणे. किमान जमीन धारणा लक्षात घेऊन कृषी यांत्रिकीकरणाला तातडीने बळ देण्याची गरज आहे. शेतकरी हितातच देशाचे, सत्ताधाऱ्यांचे हित आहे. फक्त होणारे निर्णय शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन व्हावेत आणि केलेले बदल शेतकऱ्यांना पचनी पडतील, असे असावेत इतकीच माफक अपेक्षा.

# समोरच्याला कॉपी करणे चुकीचे आहे का? हा मानसिक आजार असू शकतो का? वाचा, मानसोपचार तज्ज्ञ काय सांगतात..

अनेकदा आपण समोरच्या व्यक्तीकडे आकर्षित होतो आणि त्याचे वागणे, बोलणे एवढंच काय तर त्याचा पेहराव आपण हुबेहूब स्वत:मध्ये आत्मसात करतो. आपल्या आजुबाजूचे लोक म्हणतात, अरे हा अमुक व्यक्तीसारखा दिसतोय, त्याचे वागणे त्या अमूक व्यक्तीसारखे आहे, तो अमुक व्यक्तीसारखा बोलतोय इत्यादी. यालाच मिररींग म्हणतात. खरं तर मिररींग हा इंग्रजी शब्द आहे. याला मराठीत 'अवचेतन'सुद्धा म्हणतात. पण, बोलीभाषेमध्ये मिररींग हा शब्द अधिक वापरल्यामुळे तो लोकप्रिय झाला आहे. खरंच मिररींग वाईट आहे का? समोरच्याचे नकळत अनुकरण करणे चुकीचे आहे का? हा मानसिक आजार असू शकतो का? याविषयी सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी लोकसत्ताने मानसोपचारतज्ज्ञ डॉ. रश्मी जोशी यांच्याशी संवाद साधला.

खरंच मिररींग वाईट आहे का? डॉ. रश्मी जोशी : मिररींग ही अत्यंत साधारण बाब आहे. आपण समोरच्या व्यक्तीचे वागणे, बोलणे, पेहराव चांगल्या दृष्टिकोनातून कॉपी करतो. यात काहीही वाईट नाही. अगदी लहानपणापासून आपण मिररींग करत असतो. आई-वडिलांचे वागणे, बोलणे लहान मुले कॉपी करतात. कोणत्या गोष्टीला कशी प्रतिक्रिया द्यायची, हे मिररींगद्वारे शिकतात. त्यामुळे मिररींग हे वाईट म्हणता येणार नाही.

मिररींग का गरजेची आहे? डॉ. रश्मी जोशी : ज्या मुलांनी लहानपणी मिररींग केली नाही, त्यांना पुढे समाजामध्ये वावरताना किंवा संवाद साधताना अडचण येते, त्यामुळे मिररींग गरजेची आहे. मिररींग सहानुभूतीसुद्धा निर्माण करते. दुसऱ्याला काय वाटते, मी जर त्या परिस्थितीत असेल तर कसं वागणार, ही जाणीव निर्माण होणे म्हणजेच सहानुभूती निर्माण होणे होय. मिररींगमुळे तुम्ही समोरच्या व्यक्तीला सहज समजून घेऊ शकता. जर तुम्ही समोरच्याची मिररींग करू शकले नाही तर एका ठराविक काळानंतर तुम्हाला ती व्यक्ती तुमच्यापासून दूर गेली असे वाटू शकते. मिररींगचे दुष्परिणाम डॉ. रश्मी जोशी : जेव्हा तुम्ही जाणीवपूर्वक आणि चांगल्या दृष्टिकोनातून समोरच्याची मिररींग करता तेव्हा ते वाईट नसते, पण जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तीचे सतत अनुकरण करत आहात आणि हे करताना तुम्ही स्वत:चे अस्तित्व विसरत आहात, तर तुम्ही नकळत तुमचा आत्मसन्मान गमावून बसता. मिररींग करताना आपण कुणाचे अनुकरण करतोय आणि कितपत अनुकरण करतोय, हे समजून घेणे आवश्यक आहे. मिररींग करताना योग्य व्यक्तीची निवड करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रेमसंबंधांमध्ये तुम्ही समोरच्याला खूप महत्त्व देता. त्यांच्यासाठी वाट्टेल ते करता; त्यांचे वागणे, बोलणे, कॉपी करता आणि या नादात तुम्हाला स्वत:ला काय आवडतं हे मात्र विसरता. तुम्ही त्यांच्यावर अवलंबून राहता आणि समोरचा व्यक्ती तुम्हाला नियंत्रणात ठेवतो, ज्यामुळे तुम्ही स्वत:ची ओळख विसरता, हा सुद्धा एक मिररींगचा दुष्परिणाम असू शकतो. मिररींग करताना तुमचा हेतू का महत्त्वाचा आहे? डॉ. रश्मी जोशी : समोरच्याला मिररींग करताना जर तुमचा हेतू चांगला असेल तर त्याचा परिणामसुद्धा चांगला दिसून येईल, पण तुमचा हेतू जर वाईट असेल तर मिररींगचा दुरुपयोग होऊ शकतो. मिररींग ही एक अत्यंत



सामान्य बाब आहे, पण त्याचा अतिरेक होत असेल तर त्याचा परिणाम आपल्या व्यक्तिमत्त्वावर पडू शकतो.

तुम्ही खूप सकारात्मक आहात आणि तुम्ही नकारात्मक गोष्टी कॉपी करत असाल तर तुम्ही तुमचे अस्तित्व विसरू शकता. तुम्ही स्वत:ची ओळख विसरू शकता, त्यामुळे मिररींग ही काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. मिररींग का करतात? डॉ. रश्मी जोशी : एखाद्या व्यक्तीकडे जेव्हा तुम्ही आकर्षित होता, तेव्हा तुम्हाला त्यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व आपले असावे असे वाटू शकते. जेव्हा तुम्ही समोरच्याचा आदर करता, तेव्हा त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तुम्ही त्यांचे विचार आत्मसात करू शकता किंवा एखादी व्यक्ती तुम्हाला आवडत असेल तेव्हा त्या व्यक्तीनेही आपल्याकडे आकर्षित व्हावे, यासाठी तुम्ही त्यांचे वागणे, बोलणे, राहणीमान कॉपी करू शकता.

मिररींगला आजार म्हणता येईल का? डॉ. रश्मी जोशी : मिररींगला आजार म्हणायचं की नाही हे त्याच्यामागचा हेतू काय आहे, यावर अवलंबून आहे. समोरच्याचे मिररींग करताना स्वत:चा आत्मविश्वास, आत्मसन्मान, ओळख आणि अस्तित्व तुम्ही गमावत असाल तर तुम्ही एन्झायटी, नैराश्यसारख्या मानसिक आजाराचे बळी पडू शकता; पण तुम्ही चांगल्या दृष्टिकोनातून आणि चांगल्या हेतूने जाणीवपूर्वक मिररींग करत असाल, त्यात तुम्हाला कोणत्याही आजाराचा धोका नाही. मिररींग करताना अतिरेक करू नका, स्वत:ची ओळख जपा.

# २ गुलाबजाम खाल्ल्यावर कॅलरीज बर्न करण्यासाठी किती चालावं? डॉक्टरांनी सांगितलं खाणं व व्यायामाचं गणित

साखरेच्या पाकातुन बाहेर काढलेला वरून थोडा क्रिस्पी आणि आतून लोण्याच्या गोळ्यासारखा वितळणारा गुलाबजाम समोर आला की नाही म्हणणं म्हणजे कठीण काम होऊन बसतं. काही ठिकाणी तर या गुलाबजाम बरोबर वरून थंडगार आईस्क्रीम दिलं जातं किंवा रबडीची जोड केली जाते, म्हणजे एकाच फटक्यात चव, इच्छा आणि वजन सगळंच वाढायची सोय होते. यावर एकवेळ तुम्ही मनाला ब्रेक लावून नाही म्हणालही पण पाहुण्या रावळ्यांकडे गेल्यावर आग्रह का मोडता येतो? अशावेळी स्वतःसह समोरच्याचं मन राखायचं म्हणून आपण गुलाबजाम खाऊन घेतो. गुलाबजाम खाऊन झाला की का माहित नाही पण अचानक मनात अपराधीपणाची भावना येऊ लागते. मग तिला आळा घालण्यासाठी आपण स्वतःला सांगतो आता ना चार पावलं चालावं लागेल म्हणजे पटापट कॅलरीज बर्न होतील. पण तुम्हाला माहित आहे का, गोड खाऊन थोडं चालल्याने पटकन कॅलरीज बर्न होतील हा समजच मुळात चुकीचा आहे. असं आम्ही नाही हैदराबादच्या अपोलो हॉस्पिटलचे न्यूरॉलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार सांगतायत. नेमकं त्यांचं म्हणणं काय, चला पाहूया..




डॉ. कुमार यांनी आपल्या अकाउंटवर पोस्ट करत लिहिले की, दोन गुलाबजामांमधून (आकारानुसार) साधारण ३०० कॅलरीज प्राप्त होतात आणि त्या बर्न करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला तब्बल १ तास चालणं गरजेचं असतं.

या ज्वलंत प्रश्नाला उत्तर देताना, डॉ. रोहिणी पाटील, एमबीबीएस आणि पोषणतज्ज्ञ, संस्थापक, न्यूट्रसी लाइफस्टाइल यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, चालण्याचे प्रमाण शरीराचे वजन, चयापचयाचा वेग आणि सामान्य शारीरिक हालचाली यासारख्या अनेक घटकांवर अवलंबून असते. परंतु सर्वसाधारणपणे सांगायचे तर, सकाळी ३० मिनिटं ते १ तासाचा वेगवान वॉक केल्याने तुम्हाला कॅलरीज बर्न करण्यात आणि दिवसभरात चयापचय वाढवण्यास मदत होऊ शकते.

डॉ. पाटील पुढे सांगतात की, एका गुलाब जामुनमध्ये सुमारे १५० -२०० कॅलरीज असतात. जर तुम्ही दोन गुलाबजाम खाणार असाल तर शरीरात ३०० ते ४०० कॅलरीज वाढतात. ३० मिनिटांच्या संथ वॉकमध्ये एखादी व्यक्ती १२० ते १८० कॅलरीज बर्न करू शकते, तर ३० मिनिटांच्या वेगवान वॉकने २००- ३०० कॅलरीज बर्न होऊ शकतात. म्हणून, दोन गुलाब जामुन खाल्यानंतर कॅलरीजचे प्रमाण संतुलित करण्यासाठी, तुम्हाला सकाळी किमान ३० मिनिटं ते एक तास चालण्याचे उद्दिष्ट ठेवायचे आहे.

अतिरिक्त कॅलरीज जाळण्याशिवाय हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य, मनःस्थितीवर नियंत्रण आणि दिवसभर अधिक ऊर्जा प्राप्त करण्यासाठी सुद्धा सकाळच्या चालण्याची मदत होते. परंतु हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की व्यायाम हा आरोग्यदायी आहाराला पूरक असला पाहिजे, अति खाल्ल्यावर चालणे किंवा व्यायाम करणे हा काही जादुई उपाय नाही. चालण्याने गोड खाण्याचे दुष्परिणाम कमी होऊ शकतात, परंतु संयम आणि आरोग्यदायी पदार्थांची निवड करणे हे महत्त्वाचे आहे.

डॉ. पाटील यांनी अधोरेखित केले की, क्वचित एखाद्या दिवशी गोड पदार्थांचे सेवन करणे ठीक आहे पण त्याची शरीराला सवय लावून घेऊ नका. तसेच व्यायामाच्या बाबतसुद्धा चालणे हा उत्तम व्यायाम असला तरी तुम्ही सक्षम असल्यास केवळ चालण्यावर अवलंबून राहू नका. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योगासने किंवा वेट ट्रेनिंग करून आपण आपले आरोग्य सुधारू शकता.

# हायपरटेन्सिव्ह हार्ट डिसीज म्हणजे काय? जाणून घ्या सविस्तर

श्वास घेण्यात अडचण किंवा छातीत अस्वस्थता असल्यास आपल्या डॉक्टरांची भेट घ्या. ही लक्षणे अनेकदा उच्च रक्तदाबाचा हृदयरोग संबोधित करतात. उच्च रक्तदाबामुळे हृदयविकाराचा आजार होतो त्याला 'हायपरटेन्सिव्ह हृदयरोग' असे म्हणतात. उच्च रक्तदाबामुळे हृदयावर दबाव पडून हृदयाच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. हायपरटेन्सिव्ह हार्ट डिसीज ही एक अशी स्थिती आहे जी कोरोनरी आर्टरी डिसीज (सीएडी), हार्ट फेल्युअर आणि हृदयाचे स्नायू कमकुवत होण्याची शक्यता वाढते आणि हे वाढत्या मृत्यू दराशी संबंधित आहे.कारणे : उच्च रक्तदाब असणार्या लोकांना हायपरटेन्सिव्ह हृदयरोगाचा त्रास होतो. शिवाय,जास्त वजन, बैठी जीवनशैली, धूम्रपान आणि चरबी किंवा कोलेस्टेरॉल जास्त असलेल्या अन्नाचे सेवन यामुळे देखील हृदयविकाराचा त्रास होतो. हायपरटेन्सिव्ह हृदयरोगाचा कौटुंबिक इतिहास असला तरीही ही समस्या उद्भवू शकते.

लक्षणे : या स्थितीची तीव्रता, रुग्णाचे वय यानुसार लक्षणे वेगवेगळी असू शकतात. सतत छातीत दुखणे किंवा एनजाइना, छातीतील जडपणा, धाप लागणे, अशक्तपणा, थकवा आणि भूक मंदावणेही या समस्येची लक्षणे असतात.उपचार : रक्तदाबावर औषधोपचार सुरू करत वेळोवेळी रक्तदाबाचे निरीक्षण केले जाते. आहारातील सोडियमचे प्रमाण कमी करणे, कमी ट्रान्स फॅटस् आणि कोलेस्टेरॉल असलेला आहार घेणे योग्य असते. ताजी फळे, भाज्या, तृणधान्य आणि बीन्स खाल्ल्याने हृदयाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. दररोज व्यायाम केल्याने रक्तदाब नियंत्रित होण्यास आणि जीवनाचा दर्जा सुधारण्यास मदत होते. वजन कमी करणे, अल्कोहोल आणि धूम्रपानाची सवय सोडणे आणि नियमित वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे. रक्तदाब नियंत्रणात राखण्यासाठी योगासने आणि ध्यान करून तणावमुक्त राहण्याचा सल्ला दिला जातो. आरोग्य चांगले ठेवण्यासाठी दिवसातून ४० मिनिटे चालणे पुरेसे आहे.

# पगारात बचत करुन करोडपती व्हायचंय? 'हा' फंडा फॉलो करा

करोडपती होण्याचे सर्वांचे स्वप्न असते. पण पगार किंवा मासिक उत्पन्न प्रत्यक्षात कमी असते, आणि अनेकांचे हे स्वप्न काही प्रत्यक्षात येत नाही. पण तुम्ही जर थोडे नियोजन केले आणि योग्य गुंतवणूक केली तर तुम्ही कमी पगारातही होऊ शकता.

किती गुंतवणूक करावी? सर्वसाधारणपणे आपल्या मासिक पगाराच्या १५ ते २० टक्के रक्कम गुंतवणूक केली पाहिजे, असे मानले जाते. तुम्ही जेवढी जास्त रक्कम गुंतवू शकाल तेवढ्या कमी कलावधित तुम्ही अधिकाधिक परतावा मिळवू शकतो.

करोडपती कसे बनायचे? चांगला परतावा मिळवण्यासाठी आणि सुरक्षित गुंतवणूक म्हणून सर्वोत्तम मानले जातात. यामध्ये वार्षिक १२ टक्के इतका परतावा मिळू शकतो. कमी रक्कम गुंतवत तुम्ही कमी काळात फार चांगले सेव्हिंग करू शकता. मध्ये थोडी जोखीम असली तर महागाईचा दर लक्षात घेतला तर या प्रकारचे आपले सेव्हिंग सुरक्षित ठेवतातच शिवाय परतावा ही देतात.



ने सुरुवात करा करोडपती बनण्यासाठी तुम्हाच्या मदतीला येतील ते सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन किंवा ङखझ. कॉम्पाऊंडिग फॅक्टरमुळे तुमची लहान रक्कमेतूनही भविष्यात मोठा धनसंचय होऊ शकतो. अर्थात यासाठी आर्थिक शिस्त पाळावी लागते. समजा तुमचा मासिक पगार ५० हजार रुपये आहे. यातील तुम्ही १५ ते २० टक्के रक्कम जर ङखझच्या माध्यमातून मध्ये गुंतवली तर तुम्ही कमी कालवधित १ कोटी रुपयापर्यंत एकूण रक्कम मिळवलेली असेल.

समजा तुम्ही १५ टक्के रक्कम गुंतवण्याचा निर्णय घेतला तर तुम्ही महिन्याला ७५०० रुपये गुंतवू शकता. जर कमीतकमी १२ टक्के परतावा मिळाल तर २७६ महिन्यांत किंवा २३ वर्षांत तुम्ही १ कोटी रुपये मिळवलेली असतील.

समजा तुम्ही २० टक्के रक्कम म्हणजेच १० हजार रुपये या योजनेत गुंतवले तर २४९ महिन्यांत किंवा २०.७५ वर्षांत १ कोटीच्या वर रक्कम मिळवलेली असेल.

स्टेप अप म्हणजे काय? स्टेप अप हा एक चांगला प्रकार गुंतवणुकीसाठी आहे. यात तुम्ही दरवर्षी तुम्ही गुंतवणुकीचे प्रमाण वाढवत जाता. समजा तुम्ही मध्ये ७५०० रुपये दरमहा गुंतवले आणि दरवर्षी यात ५ टक्के वाढ करत गेला तर तुम्ही २०.३३ वर्षांत एकूण १ कोटी रुपये सेव्ह केलेले असतील. समजा तुम्हील १० प्रति महिना १०,००० रुपयांना सुरुवात केली आणि दरवर्षी त्यात ५ ट्क्के इतकी भर टाकली तर १२ टक्के इतक्या परताव्याने तुम्ही १९४ महिन्यात करोडपती झालेला असाल.

बचत संयम ठेवा च्या माध्यमातून गुंतवणूक करण्याचे एक महत्त्वाचे सूत्र आहे ते म्हणजे संयम. शेअर बाजार वाढला किंवा कोसळला म्हणून घाईगडबडीत तुमची गुंतवणूक काढून घेऊ नका. नेहमी दीर्घकालीन विचार करून गुंतवणूक करा.

# शैक्षणिक कामासाठी आवश्यक प्रमाणपत्रांच्या वितरणासाठी १८ जूनपासून विशेष शिबिरांचे आयोजन

लातूर :- इयत्ता दहावी, बारावीचा निकाल जाहीर झाला असून विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी विविध दाखले, प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. असे दाखले विद्यार्थ्यांना शाळेतच किंवा जवळच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी महाराजस्व अभियान अंतर्गत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर तालुक्यात १८ जून ते २ जुलै या कालावधीत १८ ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिली. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्यासाठी दरवर्षी महाराजस्व अभियान राबविण्यात येते. या अभियानांतर्गत दहावी, बारावी झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, आर्थिक दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, ईडब्लूएस, एसईबीसी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर, तसेच इतर शैक्षणिक दाखल्यांचे वितरण करण्यासाठी त्यांच्या शाळेच्या ठिकाणी किंवा निवासाचे जवळच विशेष शिबिरांचे आयोजन केले जाते. लातूर तालुक्यात १८ जून ते २ जुलै या कालावधीत ६६ महा ई-सेवा केंद्रांमार्फत लातूर शहरातील १० शाळा व इतर ८ महसूल मंडळात ही शिबिरे होणार आहेत. यासाठी महसूल अधिकारी, कर्मचारी यांनी नेमणूक करण्यात आली आहे. या शिबिरांच्या माध्यमातून किमान १० हजार प्रमाणपत्रे वितरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून लातूर तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या शिबिराला उपस्थित राहून दाखले प्राप्त करून घ्यावेत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी श्रीमती नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार श्री. तांदळे यांनी केले आहे. लातूर तालुक्यात १८ ठिकाणी होणार विशेष शिबीर महाराजस्व अभियानामध्ये १८ जून ते २ जुलै २०२४ या कालावधीत लातूर शहरातील श्री देशीकेंद्र विद्यालय, जयक्रांती महाविद्यालय, राजस्थान विद्यालय, महात्मा बसवेश्वर विद्यालय, श्री केशवराज विद्यालय, दयानंद महाविद्यालय, कॉकसीट महाविद्यालय, शाहू महाविद्यालय, गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशाला आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालय या दहा शाळांमध्ये विशेष शिबीर होईल. तसेच याच कालावधीत ग्रामीण भागामध्ये कन्हेरी, गातेगाव, हरंगुळ बु., चिंचोली ब., बाभळगाव, कासारखेडा, मुरुड आणि तांदूळजा याठिकाणी विशेष शिबीर आयोजित केले जाईल. या कालावधीत शिबीर स्थळी महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

# १२ वी नंतर तुम्ही गेमिंग इंडस्ट्रीमध्ये उत्तम करिअर करा

आजकाल तरुणांना त्यांच्या करिअरची खूप काळजी असते.इंजिनीअरिंग आणि मेडिकल व्यतिरिक्त असे अनेक कोर्सेस आहेत जे केल्यानंतर तुम्ही तुमच्या करिअरला नवी उड्डाणे देऊ शकता. तसेच, हे कोर्स करण्यासाठी कमी पैसे लागतात.

तसेच हे कोर्सेस केल्यानंतर नोकरी व्यतिरिक्त तुम्ही स्वतःचा व्यवसाय देखील सुरू करू शकता. काळाबरोबर अभ्यासक्रम आणि नोकरीच्या संधींमध्ये बरेच बदल झाले आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही गेमिंग इंडस्ट्रीतही उत्तम करिअर करू शकता. आजच्या युगात खेळ खेळण्याचा छंद लहान मुलांमध्येच नाही तर मोठ्यांमध्येही दिसून येतो. या युगात प्रत्येकाला ऑनलाइन गेम खेळायला आवडते. त्यामुळे हे क्षेत्र अब्जावधी डॉलर्सचे झाले आहे. अशा परिस्थितीत, जर तुम्हीही अशा लोकांमध्ये असाल, जे दररोज अनेक तास कॉम्प्युटर किंवा मोबाइलवर गेम खेळण्यात घालवतात. अशा परिस्थितीत तुम्हीही या क्षेत्रात करिअर करून चांगला पगार मिळवू शकता. १२वी नंतर तुम्ही ॲनिमेशन, गेम रायटर, गेम डिझायनिंग किंवा गेम डेव्हलपर कोर्स करू शकता. अशा परिस्थितीत तुम्हालाही या क्षेत्रात जायचे असेल तर. त्यामुळे तुम्ही कोणत्याही विद्यापीठातून किंवा संस्थेतून गेमिंगमधील डिप्लोमा, प्रमाणपत्र आणि बॅचलर पदवी अभ्यासक्रम करू शकता. अभ्यासक्रम बीए (ऑनर्स) कॉम्प्युटर गेम्स डिझाइन ॲनिमेशन आणि गेमिंगमध्ये डिझाइनिंग बीएससी इन गेमिंग ॲनिमेशन गेम डिझाइनमध्ये बीएससी जॉब व्याप्ती- गेम डिझायनर, ॲनिमेटर्स, ऑडिओ प्रोग्रामर, ग्राफिक प्रोग्रामर, गेम प्रोड्युसर, स्पोर्ट्स प्रोफेशनल, मॅनेजर, कॅस्टर, स्ट्रीमर, इन्फ्लुएंसर बनू शकता.

याशिवाय आजकाल मॉल्स वगैरेमध्येही गेम झोन बनवले जातात. ज्यातून चांगले उत्पन्न मिळू शकते.

# आदर्श रिक्षा चालक प्रकाश नाईक यांचा शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव

नवी मुंबई / के. एच. हनवते :- शिव वाहतूक सेना, रिक्षा चालक मालक सेवाभावी संस्था प्रमाणिक रिक्षा चालक श्री प्रकाश लक्ष्मण नाईक राहणार सेक्टर १० नेरुळ नवी मुंबई यांच्या रिक्षामध्ये एका महिलेची मौल्यवान वस्तू सिवुड याठिकाणी राहिली होती त्यांनी इमानदारीने स्वताहून (एनआरआय) पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सतीश कदम साहेब यांच्या समोर पोलीस स्टेशन मध्ये सदर महिलेस परत दिल्याबद्दल सगळीकडे कौतुक होत आहे सदर व्यक्तीचे चांगल्या कामगिरीबद्दल रिक्षा चालकाचे नेते श्री दिलीप किसनराव आमले अध्यक्ष शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांनी मा श्री विजय नाहटा साहेब शिवसेना उपनेते यांच्या हस्ते आदर्श रिक्षा चालक सन्मान पुर्वक सन्मानपत्र देऊन कौतुक केले, यावेळी श्री विजय नाहटा साहेब यांनी अशाप्रकारे आपल्या सर्व रिक्षा चालक मालक यांनी श्री प्रकाश नाईक यांच्या आदर्श घ्यावा तसेच श्री सतीश कदम साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.आर. आय. पोलीस ठाणे यांनीही पोलीस स्टेशन मध्ये कौतुक केले यावेळी श्री दिलीप घोडेकर उपजिल्हाप्रमुख, श्री





विजय माने शहर प्रमुख, श्री संजय भोसले सहसंपर्कप्रमुख प्रमुख, आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले जिल्हा अध्यक्ष शिव वाहतूक सेना, श्री सचिन कांबळे सहसंपर्कप्रमुख, श्री नंदु पाटील आर टी ओ प्रतिनिधी श्री प्रदीप वाघमारे कामगार नेते, श्री अतीश घरत उपशहरप्रमुख, श्री सोपान जेजुरकर उपाध्यक्ष, श्री उत्तम अबायडे सह सचिव, तसेच अनेक स्टॅन्ड प्रतिनिधी सदस्य उपस्थित होते

# डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे सन्मानित

सांगली :- प्रसिद्ध लेखक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे यांच्या निस्वार्थ समाजसेवेची आणि साहित्य क्षेत्रातील त्यांच्या भरीव कामगिरीची दखल घेऊन निशा फाऊंडेशन बेंगलोर कर्नाटक राज्य यांनी त्यांच्या समाजसेवा कार्याच्या गौरवार्थ त्यांना डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार २०२४ या अत्युच्च मानाच्या अलौकिक अश्या पुरस्काराने सन्मानित कारण्यात आले.




पातळीवरील १५५ पेक्षा जास्त अत्युच्च मानाचे पुरस्कार व ३७५ पेक्षा जास्त सन्मानपत्र देऊन त्यांचा व त्यांच्या सेवाभावी संस्थेचा गौरव केला आहे. हिंदरत्न दिपक लोंढे हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध कवी, लेखक आहेत. महाराष्ट्रातील विविध दैनिक व साप्ताहिक वृत्तपत्रांतून त्यांच्या वास्तव सत्य परखड लेखणीतुन समाजात जनजागृती घडून येण्यासाठी प्रबोधनात्मक लेख व कविता सादर होत आहेत.

दिपगंगा भागीरथी बहुद्देशीय सेवाभावी संस्था या नोंदणीकृत राष्ट्रीय संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा साहित्यिक समाजसेवक दिपक लोंढे हे एक सच्चे लोकप्रिय समाजसेवक आहेत. ज्या समाजात आपण जन्माला आलो त्या समाजाचे आणि देशाचे आपण कांहीतरी देणं लागतो ह्या न्यायाने हिंदरत्न दिपक लोंढे यांनी स्वतःला समाजसेवेच्या कार्यात सतत झोकून दिले आहे. त्यांच्या अतुलनीय निस्वार्थ समाजसेवेची दखल घेऊन आज अखेर त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवाने हिंदरत्न दिपक लोंढे यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यामुळे संपूर्ण देशभरातून त्यांच्यावर अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे. ही माझ्या जीवनांतील अत्यानंदाची बाब आहे. मला मिळालेला हा पुरस्कार मी माझ्या देशातील सर्व राष्ट्रपुरुष, राष्ट्रसंत व देशवासीयांसह माझ्या मातापिता, गुरुजनांना, बंधू भगिनींना आणि मित्रांना समर्पित करीत आहे. असं त्यांनी आवर्जून सांगितलं आहे.

# लातूर राजमाता जिजाऊ मनपा शाळेत प्रवेश उत्साहात साजरा



लातूर :- राजमाता जिजाऊ महानगरपालिका शाळा क्र.११, साळे गल्ली, लातूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशीच वहया ,पुस्तके,पेन आदी शैक्षणिक साहित्य, वृक्ष , फुगे वाटप करुन शाळा प्रवेश उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी बाल हकक व अधिकार कार्यकर्ते अँड प्रदीपसिंह गंगणे, मनपा विधी विभाग प्रमुख समाधान सुर्यवंशी, मनपा शिक्षणाधिकारी साहेबराव जाधव, मुख्याध्यापक वैभव बोंदर सर्व स्टाफ,विद्यार्थी व पालक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पनवेल मध्ये राज्यस्तरीय खुले काव्य संमेलन संपन्न झाले

पनवेल :- पनवेल येथे कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल आणि के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल यांच्या वतीने के. गो लिमीये सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात खुले कवी संमेलन पार पडले सदर कवी संमेलनामध्ये मा. प्रा. दीपा ठाणेकर (केंद्रीय प्रमुख कोमसा परिषद) ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून हजर होत्या तसेच कवी संमेलनात उपस्थित महाराष्ट्र शासनाचे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित कवी- साहित्यिक व विचारवंत उत्तम दासु तरकसे आसरडोहकर यांचा सन्मान रोहिदास पोटे लिखित युवा संवाद हे पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा दीपा ठाणेकर यांच्या हस्ते त्यांच्या कार्याचा गौरव व सन्मान करण्यात आला तसेच अण्णाभाऊ साठे पुरस्काराने सन्मानित साहित्यिक शिवाजी मोठे यांचा सुद्धा येथे सन्मान करण्यात आला

सदर कवी संमेलनाच्या विचार मंचावर उपस्थित मान्यवर म्हणून एड सुनिता जोशी (अध्यक्ष के गो लिमये सार्वजनिक वाचनालय पनवेल) श्री रोहिदास पोटे (अध्यक्ष कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल) अशा मान्यवरांनी सुद्धा सर्व कवी सोबत आपल्या कविता भारदस्त आवाजात व जोशात सादर केल्या




कवी संमेलनात बहुतांश कवीने सहभाग घेऊन आपल्या कविता भारदस्त आवाजात सादर केल्या तसेच कवी रसिक चाहत्यांनी सभागृह अगदी फुलून गेले होते सुभाष कुकडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत सुंदर केले व कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे कवी श्रुते चाहते व रसिक जनाचे रोहिदास पोटे यानी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# अनेक वर्षानंतर अतिरिक्त सत्र न्यायालय झाले मंजूर; पण इमारतीसाठी फरफट कायम

किनवट /शेख शौकत:-किनवट येथे अतिरिक्त व जिल्हा सत्र न्यायालयाला मंजुरी मिळून दीड महिन्यांचा कालावधी लोटला आहे, पण न्यायालयासाठी शहरात तात्पुरती इमारत मिळत नसल्याने बिल्डिंगची फरफट कायम आहे. अनेक वर्षांनंतर अतिरिक्त व सत्र न्यायालय मंजूर झाल्याने पक्षकार व वकिलांनी समाधान व्यक्त केले आहे, पण लोकप्रतिनिधी आमदार, खासदार यांनी बिल्डिंग मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा मुख्यालयापासून किनवट हा तालुका दीडशे किलोमीटर अंतरावर आहे. येथे अतिरिक्त सत्र न्यायालय नसल्याने पक्षकाराची मोठी परवड व्हायची. सत्र न्यायालयाशी निगडित न्यायालयीन कामकाजासाठी गोरगरीबांना नांदेड येथे गेल्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे वेळ व पैशांचा अपव्यय होत होता. आणखी हे काही थांबलेले नाही. किनवट हा आदिवासी डोंगराळ तालुका आहे. या तालुक्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायालय नाही. ते इथे मंजूर करावे, अशी मागणी गेली कित्येक वर्षापासूनची आहे. कित्येक घटकाने आंदोलनेही केलेली होती. न्यायालय मंजूर न झाल्यास तेलंगणात जाण्याचा इशारा दिला होता. दरम्यान, २ एप्रिल रोजी नांदेड जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्या. सुरेखा कोसमकर यांनी किनवट येथील बार असोसिएशनच्या अध्यक्षांना पत्र पाठवले असून, त्यात किनवट येथे जिल्हा आणि सत्र न्यायालय उभारणीसाठी मंजुरी दिल्याचे पत्रात म्हटले आहे. मंजुरीचे पत्र येऊन दीड महिन्याचा कालावधी लोटत आहे, पण केवळ बिल्डिंग उपलब्ध नसल्याने कामकाज सुरू नसल्याचे दिसून येत आहे. प्रकल्प ऑफिस कोठारी येथे जाणार असल्याने ती जुनी इमारत अतिरिक्त सत्र न्यायालयासाठी द्यावी, वकील संघ बाहेर बसून सत्र न्यायालयाचे कामकाज करायला तयार असल्याचे किनवट बार असोसिएशनचे अध्यक्ष अँड. राहुल सोनकांबळे व सचिव अँड. सुनील सिरपुरे यांनी पत्रकाराशी बोलताना सांगितले आहे. कोणतीतरी एक इमारत मिळावी, अशी मागणी

किनवट शहरात जुनी नगरपालिका इमारत आहे. गोकुंदा येथे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाची इमारत आहे.

लवकरच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कोठारी (चि.) येथील नव्याने उभारलेल्या इमारतीत स्थलांतरित होणार आहे. त्यामुळे कोणती तरी एक इमारत मिळावी, अशी अपेक्षा वकील संघ करीत आहे.

# 'राजमाता जिजामाता'त विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप

लातूर, दि. १५ - राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत करण्यात आले. यानिमित्त फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. संकुलातील शाळा फुग्यांनी सजविण्यात आल्या होत्या. संकुलातील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य गणपती मुंडे, राजीव मुंढे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वर्षी राजमाता जिजामाता विद्यालयाचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९९ टक्के लागला असून १० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले आहेत. राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावी परीक्षेचा ९८.३३ टक्के निकाल लागला आहे. नीट परीक्षेत २५ विद्यार्थी वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरले असून या महाविद्यालयातील विद्यार्थ्याने या परीक्षेत ६९२ गुण मिळवले आहेत. ६ विद्यार्थ्यांनी ६०० पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. जेईई परीक्षेत ९ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. या वर्षी तुळजाभवानी विद्यालयाचा इयत्ता दहावीचा ९५ टक्के तर बारावीचा



१०० टक्के निकाल लागला आहे.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर व शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांच्या आवाहनानुसार राजमाता जिजामाता संकुलातील विद्यार्थी व शिक्षकांना मोफत वृक्ष देण्यात येणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याच्या दारात एक तर प्रत्येक शिक्षकाच्या दारात दोन वृक्षांची लागवड व संगोपन करण्यात येणार आहे. संकुलात नवीन शैक्षणिक धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर देण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# विकसित तालुका म्हणून शिरूर अनंतपाळची ओळख निर्माण करु.खा. शिवाजी काळगे यांचा आभार व जनसंपर्क दौरा ; कार्यकर्त्यांशी साधला संवाद.

लातूर / प्रतिनिधी :- आपण सर्वांनी दिलेल्या मतदानरूपी आशिर्वादामुळे मला संसदेत जाण्याची संधी मिळाली. मी आयुष्यभर आपल्या ऋणात राहून सर्वांगिण विकासासाठी काम करीत राहीन.तसेच आपल्या तालुक्यातील विकासकामांना भरीव निधी देत शिरूर अनंतपाळ तालुक्याची ओळख विकसित तालुका म्हणून निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही लातूर चे नुतन खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी तालुकावासीयांना दिली. लातूर लोकसभा मतदारसंघ महाविकास आघाडी खा.डॉ.शिवाजी काळगे यांचा आभार व जनसंपर्क दौरा निमित्त शिवनेरी महाविद्यालय सभागृहात उपस्थित कार्यकर्ते व नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते. या आभार व जनसंपर्क दौरा कार्यकृमाच्या अध्यक्षस्थानी अशोकराव पाटील निलंगेकर हे होते. तर व्यासपीठावर काँग्रेस नेते अभय साळुंके,डॉ.अरविंद भातांब्रे,अजित माने,काँग्रेसचे ग्राणीण जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे,महिला जिल्हाध्यक्ष शिलाताई पाटील,जेष्ठ नेते बंडाप्पा काळगे, एल बी आवाळे,माजी नगरसेवक ईम्रान सय्यद, मिडीया सेलचे प्रवीण सुर्यवंशी,जिल्हा बँकेचे संचालक जयेश माने,




शिवसेना उबाठा चे भागवत वंगे,प्रताप माने, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे विविध पदाधिकारी,कार्यकर्ते आदीजण उपस्थित होते. आभार व जनसंपर्क दौरा निमित्त तालुक्यात प्रथमच आलेले खासदार डॉ. शिवाजी काळगे यांचे फटाक्यांची आतिषबाजी व वाजत गाजत जंगी स्वागत करण्यात आले.त्यानंतर तालुका महाविकास आघाडीच्या वतीने त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला.आपल्या भूमीपुत्र खासदार डॉ. काळगे यांचा अनेक गावांतील कार्यकर्ते व नागरिकांनी सत्कार करून अक्षरशः शुभेच्छांचा वर्षाव केला. या प्रसंगी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील उजेडकर, काँग्रेस सेल जिल्हाध्यक्ष संजय बिराजदार, युवक तालुकाध्यक्ष सुतेज माने,युवा शहराध्यक्ष शैलेश वलांडे,रमेश सोनवणे, सादात पटेल,नगरसेवक सुधीर लखनगावे, रामकिशन गड्डीमे,अशोक कोरे,सोमा तोंडारे, अकबर तांबोळी,प्रा.मोहनराव भोसले,दत्तात्रय भोसले,बाळासाहेब पाटील,ज्ञानेश्वर पाटील,भरत शिंदे यांसह महाविकास आघाडीचे स्थानिक नेते, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आम्हाला भाजपामुक्त राम हवा होता, अयोध्यावासीयांनी करुन दाखवले

मुंबई : लोकसभा निवडणुकीत भाजपाला महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशात अपेक्षित यश मिळाले नाही. यावरून विरोधकांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. एवढेच नव्हे तर राम मंदिराचे स्वप्न पूर्ण होऊनही अयोध्या ज्या लोकसभा मतदारसंघात येते, तेथेही भाजपाचा उमेदवार निवडून आला नाही. त्यामुळे विरोधक अधिकच आक्रमक झाले. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी एक संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी राम मंदिराच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे यांनी भाजपावर हल्लाबोल केला.राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावरून राजकारण रंगल्याचे पाहायला मिळाले. काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी आमंत्रण असूनही राम मंदिराच्या उद्घाटनाला जाणे टाळले. तर राम मंदिराच्या उभारणीवरून भाजपावर टीकास्त्र सोडले. यातच आता उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत राम मंदिर आणि भाजपा उमेदवाराचा झालेला पराभव यावरून निशाणा साधला. नाशिकमध्ये २२ जानेवारी रोजी सभा घेतली होती. त्या दिवशी काळाराम मंदिरात भगवान रामाचे दर्शन घेतले. त्या ठिकाणी म्हणालो होतो की, आम्हाला भाजपमुक्त राम हवा आहे. मग हा भाजपमुक्त राम अयोध्यावासियांनी करुन दाखवला. त्या ठिकाणी भाजपला यश मिळाले नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच नरेटिव्ह म्हणता, ते खोटे आहे. पण यांच्यात खरेपणा नाही. त्यांचा फोलपणा समोर आला आहे. देशातील जनता जागी झाली. मोदींवर लोकांचा विश्वास होता. तो उडाला आहे. आता पुढील निवडणुकीत देशाचे चित्र अधिक चांगले राहील, असे उद्धव ठाकरे म्हणाले. दरम्यान, नरेंद्र मोदी यांना समजायला पाहिजे होते की, संपूर्ण देशाने त्यांना पंतप्रधानपद दिले होते. परंतु त्यांना ते समजले नाही. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत जनतेने धडा दिला.



आता कसेबसे त्यांचे पंतप्रधानपद वाचले आहे. आता त्यांचे सरकार किती दिवस राहील सांगता येत नाही, असे सूचक विधानही उद्धव ठाकरेंनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE